# विवा महाविद्यालयात उत्साहात साजरा झाला जागतिक महिला दिन

सामान्य स्त्रीमधल्या असामान्य स्त्रीत्वाचा गौरव करून तिचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी विवा महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण कक्षातर्फे आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील महिला सुरक्षा कर्मचारी आणि हाऊसकीपिंग विभागातील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करून एक आगळा वेगळा पायंडा महिला सक्षमीकरण कक्षाने घालून दिला. महाविद्यालयाच्या  दैनंदिन  कामकाजातील अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत  असणाऱ्या या महिला कर्मचाऱ्यांचा, प्राचार्य डॉ. रविकिरण भगत यांच्या हस्ते गुलाबाचे फूल देऊन गौरव करण्यात आला. यामागची भूमिका स्पष्ट करतांना प्राचार्य डॉ. रविकिरण भगत यांनी सांगितले की, समाजात कर्तृत्ववान स्त्रियांचा नेहमीच आदर सत्कार होतो. मात्र अशा अशिक्षित किंवा अल्पशिक्षित महिलाही आपापल्या संसारात खारीचा वाटा उचलत असतात, जो चटकन कोणाच्या लक्षात येत नाही. म्हणूनच आज अशा महिलांचा गौरव करण्याची कल्पना पुढे आली. तर कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बोलतांना, 'तुम्ही नसाल तर महाविद्यालयात शिस्त लागणार नाही किंवा दोन दिवस कचरा काढला नाही तर महाविद्यालयात पाय ठेवणे अशक्य होईल. म्हणूनच तुमची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे' असे गौरवोद्गार  उपप्राचार्या प्राजक्ता परांजपे यांनी काढले.

या कार्यक्रमात कर्तृत्ववान स्त्रीचे चरित्रकथा वाचनाचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिजाबाईंपासून ऑलंपिकला ॲथलेटिक्समध्ये नवा विक्रम रचणाऱ्या बेट्टी कुथबर्ड यांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यात आला. यामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्या प्राजक्ता परांजपे तर सूत्रसंचालन हर्षवर्धिनी बोरवणकर यांनी केले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. रविकिरण भगत

प्राचार्य, विवा महाविद्यालय

यांच्या
कार्यालयातून


महिला
८ मार्च - जागतिक
“कर्तृत्ववान स्त्री
दिनांक :
स्थळ : सेमिनार हॉल (नवीन




Late Shri. Vishnu Waman Thakur Charitable Trust's
Bhaskar Waman Thakur College of Science,
Yashvant Keshav Patil College of Commerce,
Vidhya Dayanand Patil College of Arts,
(Viva College)
NAAC Accredited 'B' Grade (CGPA 2.69)
आयक्यूएसी
आणि
महिला सक्षमीकरण कक्ष
आयोजित
८ मार्च - जागतिक महिला दिनानिमित्त,
"कर्तृत्ववान स्त्री चे चरित्रकथा वाचन"
दिनांक : ८ मार्च २०१७
स्थळ : सेमिनार हॉल (नवीन कॅम्पस), वेळ : सकाळी १०.०० वाजता




Late Shri. Vishnu Waman Thakur Charitable Trust's
Bhaskar Waman Thakur College of Science,
Yashvant Keshav Patil College of Commerce,
Vidhya Dayanand Patil College of Arts
आयक्यूएसी
८ मार्च - जागतिक महिला दिनानिमित्त,
दिनांक : ८ मार्च २०१७
वेळ : सकाळी १०.०० वाजता